सेवा योजना कार्यालय

शासनाच्या चतुर्थ श्रेणीतील निवृत्त कर्मचा-यांच्या मुलास/अविवाहीत मुलीस शासनाच्या सेवेत नोकरीसाठी सेवा योजना कार्यालयांच्या शिफारशीची अट रद्द करण्याबाबत - - - -

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक आरटीआर-१०८०/१८११-१२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १० डिसेंबर १९८१

पहा :- शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक आरटीआर-१०८०-८११/१२, दिनांक १४ एप्रिल १९८१

शासन परिपत्रक :- सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक आरटीआर-१०८०/८११/१२, दिनांक १४ एप्रिल १९८१ च्या शासन परिपत्रकान्वये असे आदेश देण्यात आले आहेत, की, चतुर्थ श्रेणीतील निवृत्त कर्मचारी अथवा या श्रेणीतील एक वर्षांच्या कालावधीमध्ये निवृत्त होणारे कर्मचारी यांच्या मुलास/अविवाहीत मुलीस शासन सेवेतील चतुर्थ श्रेणी पदावरील नोकरीसाठी विशेष बाब म्हणून त्या परिपत्रकात नमूद केलेल्या शर्तींवर सेवा योजन कार्यालयाच्या शिफारशीची अट रद्द करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. ह्या आदेशांच्या संदर्भात ब-याच कार्यालयांनी ह काही मुद्दे उपस्थित केले होते. त्यांचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

| मुद्दे | स्पष्टीकरण |
| --- | --- |
| १) चतुर्थ श्रेणीतील सेवा निवृत्त कर्मचा-यांच्या मुलास/मुलीस नोकरी देताना तो कर्मचारी निवृत्त केव्हा झालेला आहे यावर कालमर्यादेच्या बाबतीत काही बंधन आहे काय ? | १) नाही. दिनांक १४-४-१९८१ पूर्वी निवृत्त झालेल्या कर्मचा-यांना/त्यांच्या मुलांना हे आदेश लागू आहेत. |
| २) ज्या कार्यालयाकडून चतुर्थश्रेणी कर्मचारी निवृत्त झाला असेल, त्याच कार्यालयात त्याच्या मुलाला अथवा मुलीस नोकरीत घेणे बंधनकारक आहे काय ? | २) नाही. ज्या शासकीय कार्यालयात चतुर्थ श्रेणीतील पद रिक्त असेल त्या कार्यालयाकडे अशा कर्मचा-यांनी अथवा त्यांच्या मुलांनी परस्पर अर्ज करावयाचा आहे. |
| ३) अशा नेमणुका तात्पुरत्या रिकाम्या होणा-या पदांकरिताच मर्यादित आहेत किंवा कायम स्वरुपाच्या पदांवर अशा नेमणुका करण्याची मुभा आहे ? | ३) चतुर्थ श्रेणीतील कोणत्याही स्वरुपाच्या रिक्त पदावर उदा. रजेच्या कारणास्तव किंवा कायम स्वरुपाच्या दीर्घ मुदतीच्या पदावरही नेमणुका करता येतील. |

४) चतुर्थश्रेणी कर्मचा-यांच्या मुलास/मुलीस

Office of The Collector, Ratnagiri
Branch
Date APR 1982

४) चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या मुलाची मुलीची नेमणूक होण्यापूर्वी जर तात्पुरत्या स्वरूपाच्या (रजेच्या कारणास्तव) नेमणुका झालेल्या असतील तर, चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या मुलास सेवेतून कमी न करता, त्यांच्या आधी नोकरीत प्रविष्ट झालेल्या कर्मचाऱ्याला सेवामुक्त करता येईल काय ?

४) नाही. कोणत्याही कारणासाठी सेवा समाप्ती करणे [illegible] अशा रजेच्या मुदतीत केलेल्या नेमणुका नियमानुसार केलेल्या असतील तर, कनिष्ठतेनुसार या सर्वसाधारण तत्वानुसार सर्वांत शेवटी नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यास प्रथम सेवामुक्त करावे.

५) जे चतुर्थश्रेणी कर्मचारी स्वेच्छेने सेवानिवृत्त झालेले आहेत, त्यांच्या मुलांना ह्या सवलतीचा ~~लाभ~~ लाभ देता येईल काय ?

५) होय.

६) सेवानिवृत्त झालेल्या किंवा एक वर्षाच्या कालावधीमध्ये निवृत्त होणाऱ्या चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचा एक मुलगा आधीच शासन सेवेत असल्यानंतर सुद्धा त्याच्या दुसऱ्या मुलास ह्या आदेशांचा लाभ देता येईल काय ?

६) नाही.

७) सेवानिवृत्त व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचा मुलगा/अविवाहीत मुलगी वर्ग-3 मधील पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता धारण करीत असेल तर, त्यांना/तिला वर्ग-3 मध्ये नेमणूक देता येईल काय?

७) नाही. वर्ग 3 मधील लिपिक वर्गीय पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोग/प्रादेशिक निवड मंडळे यांच्या कक्षेत येत असल्यामुळे त्यांच्या मार्फत निवड झाल्याशिवाय शासन सेवेतील वर्ग-3 मधील पदावर सदरील योजनेनुसार नेमणूका देता येणार नाहीत.

८) चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्याला मुलगा किंवा मुलगी नसेल तर, त्याच्या इतर नातेवाईकांना ह्या आदेशांचा लाभ देता येईल काय ?

८) नाही. मात्र अशा कर्मचाऱ्यांची पत्नी परिपत्रकात दिलेल्या अटींची पूर्तता करीत असेल तरच तिला चतुर्थ श्रेणीतील पदावर नेमणुकीसाठी विशेष बाब म्हणून शासनाच्या पूर्व सहमतीने विचार करता येईल.

९) दिनांक १४-४१९८१ चे आदेश रुपांतरीत आस्थापना व इतर आस्थापना (नियत आस्थापना सोडून) लागू आहेत काय ?

९) ज्या आस्थापनेवरील चतुर्थश्रेणी कर्मचारी स्थायी होतात आणि नियत वयोमानाप्रमाणे ६० वर्षे पूर्ण झाल्यावर सेवानिवृत्त होतात त्या आस्थापनेवरील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना हे आदेश लागू आहेत. कार्यव्ययी आणि रोजंदारी आस्थापनेवरील कर्मचारी वरील नियमात असल्याने त्यांना हे आदेश लागू पडणार नाहीत.

| | |
|---|---|
| १०) दिनांक २३-४-१९७९ च्या आदेशानुसार अनुकंपा कारणास्तव व दिनांक १४-४-१९८१ च्या आदेशानुसार सेवा निवृत्ती च्या कारणास्तव जर दोन उमेदवाराकडून एका पदासाठी अर्ज आले तर, कोणाचा विचार प्रथम करावयाचा ? | १०) अनुकंपा कारणास्तव नोकरीसाठी आलेल्या अर्जाचा विचार प्रथम करावा. |

२. दिनांक १४-४-१९८१ च्या परिपत्रकातील आदेश काढण्याचे शासनाचे चतुर्थ श्रेणीतील निवृत्त कर्मचाऱ्यांबाबत सहानुभूतीचे धोरण स्पष्ट आहे. चतुर्थ श्रेणीतील निवृत्त कर्मचाऱ्यांच्या फक्त एकाच मुलास/अविवाहीत मुलीस परिपत्रकातील [illegible] अटीप्रमाणे लाभ मिळेल हे विभाग प्रमुखांनी/कार्यालय कार्यालय प्रमुखांनी कृपया पहावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

व.अं.कोटेश्वर,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

******************

क्र. आस्थापना १०८२/८४४७/सीआर१८७/3
नगरपालिका प्रशासन संचालनालय,
नवीन प्रशासन भवन,
१५ वा मजला, मंत्रालयासमोर,
मुंबई - ४०००३२ ११ एप्रिल १९८२

प्रतिलिपी :-

१) मुख्याधिकारी (सर्व नगरपालिका)

२) प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन कोकण विभाग पुणे/नाशिक/मुंबई/अमरावती/नागपूर

३) जिल्हाधिकारी सर्व (बृहन्मुंबई व उपनगरे सोडून)

यांना या कार्यालयाचे पृष्ठांकन क्र. आस्था. २०८१/१८५९०/सीआर ३६२/२, दिनांक २७ नोव्हेंबर १९८१ चे अनुषंगाने माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

प्रतिलिपी
प्रतिलिपी सर्व का.आ (न पा प्र.)

प्रतिलिपी कासको नगरविकास व आरोग्य विभाग (मुद्दे ९,१०,११,१२)
कडे माहितीसाठी सादर.